ISSN 2278-8808 SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# निष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा मानसशास्त्रीय समुपेशन गरजांचा चिकित्सक अभ्यास

**प्रा. प्रमोद आत्माराम अहिरे, Ph. D.**

***सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख, नाहाटा कॉलेज भुसावळ***

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना**

जीवनात प्रत्येकास कोणतेही कार्य करण्यासाठी मार्गदर्शन आणि काही काही वेळा समुपदेशन आवश्यक असते. त्यामुळे तो जीवनात समस्यामय वाटेवर यशस्वी होतांना आपल्याला दिसत असतो. जगात वावरत असतांना प्रत्येक व्यक्तीला अनेक प्रकारच्या समस्या ह्या भेडसावत असतात. अशा समस्या ते स्वतः सोडवू शकत नाहीत. काही व्यक्ती अशा असतात की त्यांना आपल्यमध्ये कोणते गुण आहेत आणि कोणत्या उणिवा आहेत हे देखिल माहीत नसते. खुपच असे लोक असतात की त्यांना समायोजनाची समस्या ही भेडसावत असते. प्रामुख्याने स्त्रियांचा समावेश हा मोठ्या प्रमाणात होत असतो काही व्यक्तींना परिस्थितीशी योग्य समायोजन साधता येत नाही. यासाठी त्यांना मार्गदर्शन केले जाते. परंतु प्रत्येक ठिकाणी मार्गदर्शन उपयुक्त ठरलेच असे नाही. कारण मार्गदर्शन ही व्यापक संकल्पना आहे. मार्गदर्शन ही संकल्पना सामुदायीक असते. म्हणजेच ज्या व्यक्तींना समस्या भेडसावत असतील त्यांना ती पुरेशी नाही. यासाठी त्यांना समस्येचे निरसन करण्यासाठी त्यांना वैयक्तीक पातळीवर सोडविण्यासाठी समुपदेशन हा उत्तम उपाय आहे. व्यक्तीच्या समस्येनुरुप समुपदेशनाचे देखील प्रकार पडतात. एखाद्या व्यक्तीस त्याच्या कौंटुबीक समस्या असतील तर त्यासाठी कुटूंब समुपदेशज , व्यावसायिक समस्या असतील तर व्यावसायिक समुपदेशक, शैक्षणिक संदर्भात असणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी आज समुपदेशनाचे महत्व सर्वज्ञान आहे. समुपदेशनाने सर्व समस्या सोडविल्या जातात आणि व्यक्ती व्यावसायीक व विद्यार्थी आपली प्रगती करु शकतो.

उच्च माध्यमिक वर्गातील विद्यार्थी साधारणातः १५ ते १७ या वयोगटातील असतात. म्हणजेच ती किशोरावस्थेत गेलेली असतात. या अवस्थेतील मुले लहानही नसतात आणि प्रौढही झालेली नसतात. या वयातील विद्यार्थी नेहमी गोंधळलेल्या अवस्थेत असतो. काय करावे आणि काय करु नये हे त्याला कळत नसते. ते स्वतःचा निर्णय स्वतः घेवू शकत नाही. आणि चुकीचा निर्णय घेवुन स्वतःचे नुकसान करुन घेतात. म्हणुन जे क्षेत्र आपण निवडलेले आहे. त्या क्षेत्रात आपली प्रगती होत नाही. म्हणुन जे क्षेत्र आपण निवडलेले आहे. त्या क्षेत्रात आपली प्रगती होत नाही. म्हणुन सुरुवातीपासुन आपले जे ध्येय, क्षेत्र ज्यामध्ये आपल्याला प्रगती करायची आहे. ते योग्यपणे निवडणे गरजेचे आहे. यामध्ये जे मागे पडले असतील ते खचुन जातात. अशा वेळी त्यांना सांभाळण्याचे म्हणजेच मदत करण्याचे आणि त्यांची जी काही समस्या असेल ती सोडवून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम समुपदेशनाने शक्य होत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या या समस्या सुटल्या की, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो. आणि तो स्वतःचा निर्णय स्वतः घेण्यास तयार होत असतो. म्हणुनच या गटास समुपदेशनाची गरज किती प्रमाणात आहे हे अभ्यासण्यासाठी संशोधनासाठी गट निवडणे योग्य ठरेल.

**समस्या विधान**

शिरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा मानसशास्त्रीय समुपेशन गरजांचा चिकित्सक अभ्यास ज रजे.

**उद्दिष्टे**

१. कनिष्ठ महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

२. कनिष्ठ महाविद्यालयातील कला व वाणिजय शाखेतील विद्यार्थ्यांचा मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३. कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान व वाणिजय शाखेतील विद्यार्थ्यांचा मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिज ल्पना**

१. कनिष्ठ महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

२. कनिष्ठ महाविद्यालयातील कला व वाणिजय शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

३. कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

**संशोधन पद्धती**

संशोधकाने संशोधनासाठी शिरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा मानसशास्त्रीय समूपदेशन गरजांचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.

**जनसंख्या**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने शिरपूर  शहरातील उच्च माध्यमिज  विद्यालयातील ११ वीतील सर्व कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थी हे जनसंख्या म्हणुन  निश्चित केली होती.

**न्यादर्श**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने सहेतूक नमुना निवड या पद्धतीने शिरपूर शहरातील जनिष्ठ महाविद्यालयातील ज ला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील एकूण १२० विद्यार्थ्यांची न्यादर्श म्हणुन निवड केली होती.

**संशोधनाची साधने**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा समुपदेशन गरजांचा अभ्यासासाठी डॉ. विजयालक्ष्मी चौव्हान (उदयपूर) आणि सौ. गुंजन अरोरा (अहमदाबाद) यांनी प्रमाणित केलेली Psychological Counselling Needs Scale  या कसोटीचा वापर केला आहे. या कसोटीत/प्रश्नावलीत एकुण २५ प्रश्न आहे.

**संज्याशास्त्रीय परिमाजे**

प्रस्तुत संशोधनात संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन व टी परीजिज ा या संज्याशास्त्रीय परिमाजांचा अवलंब केला आहे.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

**परिकल्पना ०१ कनिष्ठ महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.**

| कनिष्ठ महाविद्यालय | संज्या | मध्यमान | प्रमाणविचलन | नमुना 't' | प्राप्त 't' | त्याग / स्वीजार |
|---|---|---|---|---|---|---|
| **ज ला शाजा** | ४० | ६८.९९ | ९.६० | २.०० | ०.९१ | स्वीजार |
| **विज्ञान शाजा** | ४० | ६६.९८ | १०.०७ | | | |

df = ७८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य २.०० आहे व प्राप्त 't'मूल्य ०.९१ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही. मध्यमानातील आलेला फरक हा योगायोगाने आला आहे असे म्हणावे लागेल. यावरून असे म्हणता येईल की, कनिष्ठ महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजा समान दिसून येतात.

**परिज ल्पना ज्रं . ०२ ज निष्ठ महाविद्यालयातील कला व वाणिजय शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.**

| कनिष्ठ महाविद्यालय | संज्या | मध्यमान | प्रमाणविचलन | नमुना 't' | प्राप्त 't' | त्याग / स्वीजार |
|---|---|---|---|---|---|---|
| **ज ला शाजा** | ४० | ६८.९९ | ९.६० | २.०० | ०.८४ | स्वीजार |
| **वाणिज्य शाजा** | ४० | ६७.०३ | ११.०७ | | | |

df = ७८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य २.०० आहे व प्राप्त 't'मूल्य ०.८४ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लाजेल. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील कला व वाणिजय शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही. मध्यमानातील आलेला फरक हा योगायोगाने आला आहे असे म्हणावे लागेल. यावरून असे म्हणता येईल की, कनिष्ठ महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजा समान दिसून येतात.

**परिज ल्पना ०३: ज निष्ठ महाविद्यालयातील विज्ञान व वाणिजय शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.**

| कनिष्ठ महाविद्यालय | संज्या | मध्यमान | प्रमाणविचलन | नमुना 't' | प्राप्त 't' | त्याग / स्वीजार |
|---|---|---|---|---|---|---|
| **विज्ञान शाजा** | ४० | ६६.९८ | १०.०७ | २.०० | ०.०२ | स्वीजार |
| **वाणिज्य शाजा** | ४० | ६७.०३ | ११.०७ | | | |

df = ७८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य २.०० आहे व प्राप्त 't'मूल्य ०.०२ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान व वाणिजय शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही. मध्यमानातील आलेला फरक हा योगायोगाने आला आहे असे म्हणावे लागेल. यावरून असे

म्हणता येईल की, कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजा समान दिसून येतात.

**ि◻ष्ज र्ष**

१. कनिष्ठ महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

२. कनिष्ठ महाविद्यालयातील कला व वाणिजय शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमा◻ गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

३. कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञा◻ व वाणिजय शाखेतील विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशन गरजांचा मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

**संदर्भसूची**

*Aggarwal J.C.(1991), Educational & Vocational Guidance & Counselling, New Delhi : Doaba House.*

*Best J.W. and Khan K.M., Recent Research in Education (7th Edition) New Delhi, Prentice Hall of India.*

*Kumar Ranjit, Research Methodology, (3rd Edition) , Sage South Asia Edition. (2010)*

*अहेर हिरा : उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षक व शिक्षण : विद्या प्रकाशन नागपुर : मार्च १९९५.*

*करंदीकर सुरेश,मंगळरुकर मीना : उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण. कोल्हापूर : फडके प्रकाशन.*

*करंदीकर, सुरेश (२००९) प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, कोल्हापूर : फडके प्रकाशन.*

*गुळवणी, मेघा (२००९) मार्गदर्शन आणि समुपदेशन, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.*

*डॉ घोरपडे आणि घोरपडे, कला (२०१०) शैक्षणिक मार्गदर्शन आणि समुपदेशन , नागपूर : विद्या प्रकाशन.*

*जगताप, ह.ना. (आवृत्ती ०३), (२००७). शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे: नरेंद्र प्रकाशन.*

*दुनाखे, अरविंद (२००९) शैक्षणिक मार्गदर्शन आणि समुपदेशन, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.*

*बापट वि.रा. : शैक्षणिक संशोधन : नूतन प्रकाशन, पुजे : २००३.*

*भिंताडे, वि. रा.: शैक्षणिक संशोधन पध्दती : नूतन प्रकाशन , पुणे : २००४.*